महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २५३ वा | दिनांक : ०५/०८/२०२५ | वार : मंगळवार

## ओबीसी आरक्षणासह होणार महापालिका निवडणुका : सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय



**मुंबई :** सर्वोच्च न्यायालयाने नव्या प्रभाग (वॉर्ड) रचनेला आणि ओबीसी आरक्षणाला आव्हान देणाऱ्या सर्व याचिका फेटाळून लावत, निवडणुकांना मंजुरी दिली आहे. त्यामुळे आता संपूर्ण राज्यभरात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नव्या प्रभाग रचनेनुसार आणि 27 टक्के ओबीसी आरक्षणासह होणार हे निश्चित झाले आहे. त्यामुळे महापालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे.

नव्या प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या विविध याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या होत्या. काही स्थानिक घटकांनी नव्या रचनेतील बदलांवर आक्षेप घेतले होते. मात्र, आज न्यायालयाने या याचिका फेटाळत राज्य सरकारच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. त्यामुळे मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक यांसारख्या महत्त्वाच्या महापालिकांमध्ये नव्या प्रभाग बांधणीच्या आधारे निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

लातूर जिल्ह्यातील औसा नगरपालिकेच्या निवडणुकी संदर्भात एक याचिका सुप्रीम कोर्टात दाखल करण्यात आली होती. याचिकेत 11 मार्च 2022 पूर्वीच्या वॉर्ड रचनेनुसार निवडणूक घेण्याची मागणी करण्यात आली होती. या याचिकेवर आज सुनावणी झाली असून, सुप्रीम कोर्टाने ती फेटाळून लावली. ही निवडणूक सुद्धा नवीन वॉर्ड रचनेप्रमाणे घेण्यात यावी, असे निवडणूक आयोगाने अधिसूचित केले होते. त्यामुळे आजच्या आदेशाप्रमाणे नवीन वॉर्ड/प्रभाग रचनेनुसार निवडणुका होतील, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओबीसी आरक्षणाला आव्हान देणारी याचिका देखील सुप्रीम कोर्टाने आज फेटाळून लावली. या याचिकेच्या सुनावणीवेळी सुप्रीम कोर्टाने सांगितले की, आमच्या 6 मे 2025 च्या आदेशानुसार 27% ओबीसी आरक्षणानुसारच निवडणुका घेण्यात येतील. तसेच वॉर्ड किंवा प्रभाग रचना हा पूर्णपणे राज्य सरकारचा अधिकार आहे. राज्य विधिमंडळाने तसा कायदा केला आहे आणि या कायद्याला स्थगिती नसल्याने हा पूर्णपणे अधिकार राज्य सरकारचा आहे, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नवी प्रभाग रचना की जुनी प्रभाग रचना याविषयी वाद सुरू होता. महाविकास आघाडीच्या काळात प्रभाग रचनेमध्ये काही बदल करण्यात आले होते. त्यानंतर शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात पुन्हा त्या प्रभाग रचनेत बदल करण्यात आले. मात्र, वॉर्ड रचना कशी असावी याचा अधिकार पूर्णपणे राज्य सरकारचा आहे, त्यानुसार प्रभाग रचना होईल. जी प्रभाग रचना राज्य सरकार ठरवेल त्यानुसारच निवडणुका होईल, असे आज सर्वोच्च न्यायालयाने आदेशात स्पष्ट केले आहे.

## राज ठाकरेंविरोधातील याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली



**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याविरोधात उत्तर भारतीय समुदायाविरोधात द्वेषमूलक भाषण आणि हिंसाचार भडकवल्याचा आरोप करत एक जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली असून, याचिकाकर्त्याला फटकारत मुंबई उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला.

उत्तर भारतीय विकास सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनिल शुक्ला यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे वकील घनश्याम उपाध्याय यांच्या मार्फत शुक्रवारी 18 जुलै 2025 रोजी ही याचिका दाखल केली होती. राज ठाकरे आणि मनसे कार्यकर्त्यांविरुद्ध फौजदारी कारवाई करावी आणि निवडणूक आयोगाने मनसे पक्षाची राजकीय मान्यता रद्द करावी, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली होती.

या याचिकेवर सरन्यायाधीश बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठासमोर आज सुनावणी पार पडली. सुनावणी दरम्यान, सरन्यायाधीशांनी याचिकाकर्त्याचे वकील यांना "तुम्ही थेट सर्वोच्च न्यायालयात का आलात? मुंबई उच्च न्यायालय सुट्टीवर आहे का?" असा सवाल केला.

त्यानंतर याचिकाकर्त्याने मी याचिका मागे घेऊ शकतो का? असे विचारले. त्यानंतर कोर्टाने याचिका मागे घेण्याची परवानगी दिली आणि मुंबई हायकोर्टात जाण्याचा सल्ला दिला. "याचिकाकर्त्याचे वकील हायकोर्टात जाण्याचे स्वातंत्र्य असल्याचे सांगत ते याचिका मागे घेत आहे. आम्ही स्पष्ट करतो की आम्ही याचिकेच्या गुणवत्तेचा विचार केलेला नाही," असे कोर्टाने आदेशात म्हटले.

याचिकेत शुक्ला यांनी म्हटले आहे की, राज ठाकरे यांनी 30 मार्च 2025 रोजी गुढीपाडवा मेळाव्यात केलेल्या प्रक्षोभक भाषणामुळे हिंदी भाषिकांविराधोत हिंसा वाढली. या भाषणानंतर मुंबईतील पवई, वर्सोवा आदी ठिकाणी हिंदी भाषिक कर्मचाऱ्यांवर हल्ले करण्यात आले.

या भाषणाआधी आणि नंतरही त्यांना धमक्या, छळ, आणि जीवाला धोका निर्माण करणारे प्रकार वारंवार घडले. एका ट्वीटमध्ये त्यांचा खून करण्याचे उघड आवाहन करण्यात आले. 100 हून अधिक अज्ञात फोन कॉलद्वारे धमक्या मिळाल्या. 6 ऑक्टोबर 2024 रोजी मनसेशी संबंधित सुमारे 30 जणांच्या गटाने त्यांच्या पक्षाच्या कार्यालयावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, असे आरोप देखील सुनील शुक्ला यांनी याचिकेत केले होते.

दरम्यान, यापूर्वीही महाराष्ट्र सरकार, पोलिस महासंचालक, पोलिस आयुक्त, तसेच निवडणूक आयोगाकडेही आपण लेखी तक्रारी केल्या. मात्र, कोणतीही कारवाई झाली नसल्याचा दावा, सुनील शुक्ला यांनी आपल्या याचिकेत केला.

## आंतरजातीय प्रेमविवाह केल्याने कुटुंबीयांचा संताप - तरुणाला बेदम मारहाण, लेकीचे दिवसाढवळ्या अपहरण

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात आंतरजातीय प्रेमविवाह केल्याच्या कारणावरून एका 39 वर्षीय तरुणाला गावातच दिवसाढवळ्या घरात घुसून बेदम मारहाण करण्यात आली, आणि त्यानंतर त्याच्या पत्नीचे लोकांनी अपहरण केले. तरुणीच्या आई आणि भावानेच हे धक्कादायक कृत्य केले आहे. या घटनेचा थरारक व्हिडिओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत असून, संतापाची लाट उसळली आहे. याप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. पीडित तरुणाचे नाव विश्वनाथ बबन गोसावी असून तो सध्या गंभीर जखमी अवस्थेत उपचार घेत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही मारहाण आणि अपहरण आंतरजातीय प्रेमविवाहामुळे घडली असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. विश्वनाथ गोसावी याचे प्राजक्ता (वय २८) या तरुणीसोबत प्रेमसंबंध होते. मात्र, मुलीच्या घरच्यांचा विश्वनाथ आणि प्राजक्ताच्या नात्याला विरोध होता. असे असतानाही दोघांनी काही दिवसांपूर्वी आळंदी येथे वैदिक पद्धतीने विवाह केला. मात्र, हा आंतरजातीय विवाह प्राजक्ताच्या कुटुंबियांना मान्य नव्हता. मुलीने पळून जाऊन आंतरजातीय विवाह केल्यामुळे समाजात आपली बदनामी झाल्याचा राग त्यांच्या मनात होता. यातूनच त्यांनी प्राजक्ता आणि विश्वनाथ यांना आधी जबर मारहाण केली. त्यानंतर त्यांनी प्राजक्ताचे अपहरण केले. भरचौकात ही मारहाण आणि अपहरणाची घटना घडली. घटनास्थळी उपस्थितांनी हा सर्व प्रकार आपल्या मोबाईलमध्ये कैद केला. प्राजक्ताच्या दोन भावांसह तिच्या आईने आणि इतर 15 जणांनी आधी विश्वनाथच्या घरात घुसून त्याला बेदम मारहाण केली आणि नंतर त्याच्या पत्नीला जबरदस्तीने घेऊन गेले. या घटनेचा एक थरारक व्हिडिओ एका स्थानिक नागरिकाने आपल्या मोबाईलमध्ये शूट केला, ज्यात आरोपींचा जमाव विवाहितेला जबरदस्तीने वाहनात कोंबून नेतो आहे, हे स्पष्टपणे दिसतं. हा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. या प्रकरणी खेड पोलिस ठाण्यात आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांचा शोध सुरू आहे. घटनेचा पुढील तपास पोलिस करत आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ५ ऑगस्ट २०२५


## माळीवाड्यात युवकांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश



**छत्रपती संभाजीनगर (प्रा. शिवाजी गायकवाड) :** आज माळीवाडा येथे अनेक युवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. या प्रसंगी नव्याने पक्षात दाखल झालेल्या युवकांना नियुक्तीपत्र देण्यात आले. तसेच स्थानिक नागरिकांच्या मुलभूत सोयी-सुविधांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.कार्यक्रमाला जिल्हाध्यक्ष पांडुरंग तांगडे पाटील, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष उद्धव बनसोडे, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष रज्जाक पठाण,अल्पसंख्याक जिल्हा कार्याध्यक्ष सैय्यद लायकोद्दीन,महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस प्रा. शेख सलीम, सामाजिक न्याय विभागाचे पश्चिम तालुका अध्यक्ष रवींद्र दिवेकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.या प्रवेश सोहळ्यात रवी सोळस यांना माळीवाडा सामाजिक न्याय विभागाचे अध्यक्ष पदी नियुक्ती देण्यात आली, उपाध्यक्ष सोमीनाथ साठे,सचिव दिपक शिनगारे, कोषाध्यक्ष नितिन मावस,प्रविण शेजवळ,गणेश साबळे,राजु शिंदे,रामदास शेजवळ,लक्ष्मण गायकवाड,विजय दणके, शेख सलीम यांची नेमणूक करण्यात आली यावेळी राजु दिवेकर,विजय दिवेकर, सुरेश त्रिभुवन,राहुल साळवे, सिद्धार्थ त्रिभुवन, राजेंद्र हिवराळे, साहेबराव दिवेकर आदिंसह सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व महिलांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

## वाचनाने सजग नागरिक निर्माण होतो - लक्ष्मीकांत देशमुख



**बीड :** बालसाहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांच्या 'एकविसाव्या शतकारंभीचे बालसाहित्य' या समीक्षा ग्रंथास लीलावती भागवत राज्यस्तरीय पुरस्कार पुणे येथे दि. २ ऑगस्ट रोजी ९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. वाचन ही उन्नत मानवी संस्कृती आहे. चारित्र्यवान पिढीसाठी बालवाचक घडविणे गरजेचे आहे. वाचनातून मुलांची जिज्ञासा आणि आकलन वाढते तर लोकशाही टिकविण्याचे कार्य सजग नागरिक करत असतात आणि वाचन हे सजग नागरिक निर्माण करते असे प्रतिपादन ९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी यावेळी बोलताना केले. मराठी बाल साहित्यातील उत्कृष्ट निर्मितीसाठी राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. रोख रक्कम, प्रमाणपत्र, ग्रंथ भेट देऊन राज्यातील लेखक, प्रकाशक, चित्रकार यांना गौरविण्यात आले. लता मंगेशकर सभागृह, मॉडर्न महाविद्यालय, पुणे येथे अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू, कार्यवाह अनिल कुलकर्णी, प्रसाद भडसावळे, प्राचार्य राजेंद्र झुंजारराव, संजय ऐलवाड, सचिन बेंडभर, विनोद सिनकर, बबन शिंदे, राजेंद्र जेधे, तात्यासाहेब भराटे, संजीवनी जाधव, राहुल काशिद, ऋषिकेश जाधव, ओंकार जेधे यांचेसह राज्यभरातील लेखक, कवी, प्रकाशक यांची उपस्थिती होती.






## उद्योजक तरुणावर काळाची झडप





**दौलताबाद (जावेद अहमद) :** ट्रॅक्टरच्या ट्रॉलीला धडकून एक युवकाचा मृत्यू धुळे सोलापूर महामार्गावर फतियाबाद गावाच्या बस स्टॅन्ड जवळ रविवारी (दि ३) संध्याकाळी ५.३० वाजेच्या सुमारास ट्रॅक्टरच्या ट्रॉलीला धडकल्याने ऋषिकेश सचिन चोरडिया वय २८ वर्षे,राहणार अहिंसा नगर, छत्रपती संभाजीनगर शहर, ताजी छत्रपती संभाजीनगर याच्या मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार ऋषिकेश हे कावासाकी रेसिंग स्पोर्ट्स बाईक क्रमांक एम एच २० एच इ ०००९ वरून छत्रपती संभाजी नगर येथून धुळे सोलापूर महामार्गाने जांभाळा गावात असलेल्या खडी क्रेशर मशीन कडे जात असताना ट्रॅक्टरच्या ट्रॉलीला पाठीमागून धडकून झालेला अपघातात गंभीर जखमी झाले. जखमी ऋषिकेश ला ग्रामस्थांच्या मदतीने जगद्गुरु नरेंद्रचार्य संस्थान च्या रुग्णवाहिकेत टाकून छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएम दवाखान्यात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले. ऋषिकेश हा घरातील कर्ता पुरुष होता. वडिलांचे सर्व काम तोच पाहत होता त्याच्या पश्चात आई, वडील एक लहान भाऊ आहे. अचानक झालेल्या अपघाताने चोरडिया कुटुंबावर दु:खाचे डोंगर कोसळले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ५ ऑगस्ट २०२५


## आज महसूल सप्ताह निमित्त मिटमिटा येथील अप्पावाडी येथे वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला



**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड)** : भावसिंगपुरा मंडळ अंतर्गत मौजे मिटमिटा येथे वृक्षारोपण चा कार्यक्रम पार पडला,यानिमित्त उपस्थित मंडळ अधिकारी, मंडळातील सर्व तलाठी,श्री लक्ष्मणआप्पा लिंभारे, व इतर ग्रामस्थ मंडळ अधिकारी भावसिंगपुरा मंडळ अधिकारी गणेश सोनवणे,तलाठी मिटमिटा राजेंद्र आठवले, तलाठी पडेगाव साईनाथ बोन्द्रे, तलाठी भावसिंगपुरा राजेंद्र सुलाने, तलाठी माळीवाडा प्रशांत वनकर,तलाठी दौलताबाद सुरज गिरी,तलाठी पद्मपुरा रोहित पवार, कांतीनाथ आप्पा सदावर्ते, देविदास आप्पा, आरविंद आप्पा, राम आप्पा, ईश्वर आप्पा, प्रशांत आप्पा, महेश सदावर्ते, सौरभ आप्पा लिंभारे, आप्पावाडी ता. जि. छ. संभाजीनगर आदींची मोठी उपस्थिती होती.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभिमान




**दौलताबाद (जावेद अहमद)** : छत्रपती संभाजीनगर महसूल विभागाच्या वतीने १ ते ७ ऑगस्ट रोजी महसूल अभियान राबविण्यात येत आहेदिलीप स्वामी जिल्हाधिकारी .व्यंकट राठोड उपविभागीय अधिकारी ,परेश चौधरी अपर तहसिलदार ,महसूल मंडळ भावसिंगपुराअपर तहसिल कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनखाली साजरा करण्यात येत असूनया अंतर्गत आज दि ०४ सोमवार रोजी माळीवाडा ग्रामपंचायत येथे अभिमान राबविण्यात आले यात जात,उत्पन्न, रहिवासी प्रमाणपत्र वाटप व सातबारा फेरफार नक्कल वाटप व अग्रीस्टिक ई पीक पाहणी बाबत मार्गदर्शन करण्यात आलेतसेच मंडळाच्या विभागात २५० वृक्षारोपण करण्यात आलेतसेच पर्यटन संचनालय विभागाच्या वतीने शेतकरी यांच्या साठी कृषी पर्यटन विषयी योजनेची अंमलबजावणी सुरू आहे यासाठी सहायक पर्यटन शिवाजी गायकवाड यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून माहिती दिलीयावेळी भावसिंगपुरा मंडळ अधिकारी गणेश सोनवणे,तलाठी सूरज गिरी दौलताबाद, प्रशांत वनकर माळीवाडा, राजेंद्र आठवले मिटमिटा ,साईनाथ बोन्द्रे पडेगाव,राजेंद्र सुलाने भावसिंगपुरा ,रोहित पवार पदमपुरा,सरपंच ज्योती नंदू मुळे, उपसरपंच मनिष गाजरे,पोलीस पाटील प्रमोद साठे,काकासाहेब गुंजाळ,मुख्यधापक अनंत गोरे,सुनिल मुळे,नंदकिशोर मुळे,सुरेंद्र जगधने,वैजिनाथ मुळे,राजु पल्हाळ,नंदा खजिनदार, भगवान बनसोडे ग्रामपंचायत क्रमचारी, शेतकरी,ग्रामस्थ उपस्थिती होते

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी डॉ. वाजिद शेख यांचा गुणगौरव




**जालना :** बारवाले महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी डॉ. वाजिद शेख (बी.एस्सी.२०१३-१४) यांनी गणित या विषयात पीएच.डी. प्राप्त केल्याबद्दल त्यांचा आज गुणगौरव करण्यात आला. यापूर्वी वाजिद शेख यांनी एम. एस्सी. मध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथून गणितात सुवर्णपदक प्राप्त केले होते. याच विषयात त्यांनी सेट व नेट या परीक्षाही उत्तीर्ण केल्या आहेत. "कन्स्ट्रक्शन अँड प्रॉपर्टीज ऑफ द लिनियर कोडस् बेसड् ऑन सम स्पेशल फंक्शन्स " या विषयावर त्यांनी डॉ. रुपाली जैन यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. प्राप्त केली. यासाठी त्यांना मौलाना आझाद नॅशनल फेलोशिप मिळाली होती. प्रारंभी गणित विभाग प्रमुख प्रा. संदीप पाटील यांनी सत्कार आयोजन करण्यामागची भूमिका विषद केली.ते म्हणाले, महाविद्यालयात नियमित येऊन वर्गात बसणारे विद्यार्थीच त्यांच्या करिअर बद्दल जागरूक असतात. शिक्षकांसोबत विद्यार्थ्यांनी सातत्याने संपर्क साधून आपले भावी जीवन उज्वल करावे. यावेळी डॉ. वाजिद शेख म्हणाले की, कौटुंबिक परिस्थितीचा बाऊ न करता आपण पुढे आले पाहिजे. कष्ट, प्रामाणिकपणा, जिद्द आणि शिक्षकांची प्रेरणा यामुळे मी हे यश संपादन केले आहे. माझ्यात गणित विषयाची आवड निर्माण करणारे प्रा. संदीप पाटील यांना हा थेसिस मी समर्पित केला आहे.यावेळी प्रा. भूषण नाफडे यांनी डॉ. वाजिद शेख यांचे कौतुक करून विद्यार्थ्यांनी त्याचा आदर्श घ्यावा असे आवाहन केले. आपणाला कोणतीही गोष्ट सहज मिळत नाही त्यासाठी संघर्ष करावा लागतो. मेहनत, सातत्य आणि अभ्यास यातून अनेक बाबी मिळविता येतात असे ते म्हणाले.यावेळी प्रा. बळीराम कटारे, प्रा. निलेश बर्डे, प्रा. रवींद्र भोरे, प्रा. सुरेश कागणे, प्रा. विलास भुतेकर प्रा.अभिजीत भुतेकर यांच्यासह बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ५ ऑगस्ट २०२५


## गणेशोत्सवात रात्री उशिरापर्यंत लोकल सुरु ठेवावी : मंत्री मंगलप्रभात लोढा यांची मागणी



**मुंबई :** महाराष्ट्र आणि मुंबई एमएमआर परिसरात साजरा होणारा गणेशोत्सव जगप्रसिद्ध असून रात्री उशिरापर्यंत गणेशभक्त दर्शनासाठी येत असतात अशा वेळी गणेश भक्तांसाठी लोकल आणि मेट्रो सुरु ठेवावी, यासंदर्भात रेल्वे आणि मेट्रो प्रशासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगरासह पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले. महापालिकेच्या ग्रँट रोड येथील डी विभाग कार्यालयात आयोजित जनता दरबारात ते बोलत होते.

गणेशोत्सवा दरम्यान महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून गणेशभक्त मुंबई परिसरात दाखल होतात. या स्थितीत भक्तांच्या सोयीसाठी सार्वजनिक वाहतूक सुरु असणे अतिशय महत्वाचे आहे. त्यासंदर्भात रेल्वे आणि मेट्रो प्रशासनाशी पत्र व्यवहार सुरु असल्याची माहितीही मंत्री लोढा यांनी जनता दरबारात दिली. प्रशासकीय यंत्रणा राबवून थेट जनतेपर्यंत पोहोचले पाहिजे. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या पाहिजेत, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळातील सदस्यांना केली होती. या सूचनेला अनुसरूनच या जनता दरबाराचे आयोजन केल्याचे मंत्री लोढा यांनी स्पष्ट केले.

गेल्या महिनाभरात दक्षिण मुंबईत झालेल्या पाच जनता दरबारात ऑनलाइन आणि ऑफलाईन मिळून सुमारे २ दोन हजार नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. नागरिकांच्या नागरी समस्या सोडवण्यासाठी म्हाडा, एस. आर. ए. महापालिका आणि रेल्वे सह बारा विभागांचे अधिकारी एकाच छताखाली आणण्यात आले. त्यामुळे नागरिकांना हेलपाटे न मारता जागच्या जागी त्यांच्या समस्यांचे निराकरण करणे शक्य झाले असल्याचेही लोढा यांनी सांगितले.

जनता दरबारात अनेक नागरिकांनी म्हाडा संबंधित पुनर्विकास,दुरुस्ती आणि संक्रमण शिबीर संदर्भात तक्रारी मांडल्या होत्या. अनेकदा नागरिकांना संक्रमण शिबिराची सोय न करता इमारती रिकाम्या करण्यासाठी सी टूच्या नोटीस देण्यात आल्या होत्या. या संबंधित रहिवाशांची बाजू मंत्री लोढा यांनी ऐकून घेतली.यासंदर्भात म्हाडाचे उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जायसवाल यांच्या सोबत लवकरच बैठक घेणार असून संक्रमण शिबीर झाल्याशिवाय रहिवाश्यांना घर रिकामे करण्याची नोटीस देऊ नये,अशी सूचना करणार असल्याची माहिती लोढा यांनी यावेळी दिली.तसेच संक्रमण शिबीर तयार नसल्यास त्वरित इमारतीची दुरुस्ती करून नागरिकांना दिलासा द्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## रोहित पवारांना अर्धवट व्हिडिओ कोणी पाठवला? मेघना बोर्डीकर





**अहिल्यानगर :** महायुती सरकारमधील मंत्र्यांच्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे गेल्या काही दिवसांत राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. अनेक मंत्री आपल्या कृती आणि विधानांमुळे विरोधकांच्या हातात मुद्दे देत आहेत. अलीकडेच आमदार रोहित पवार यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा रम्मी खेळतानाचा व्हिडिओ समोर आणला. त्यानंतर मंत्री मेघना बोर्डीकर यांचा ग्रामसेवकाला धमकी देतानाचा व्हिडिओही त्यांनी शेअर केला. यामुळे रोहित पवार आणि मेघना बोर्डीकर यांच्यात शाब्दिक खडाजंगी उफाळून आली आहे.

अहिल्यानगर दौऱ्यावर असताना मंत्री मेघना बोर्डीकर यांनी व्हायरल झालेल्या व्हिडिओवर स्पष्टीकरण दिले. यावेळी त्यांनी, हा व्हिडिओ रोहित पवारांना कुणी पाठवला, हे त्यांनी स्पष्ट करावे, असे सांगून थेट सवाल उपस्थित केला. तसेच, रोहित पवारांना नेता बनण्याची घाई झाली आहे, अशा शब्दांत त्यांनी टोला लगावला आहे.

व्हिडिओवर स्पष्टीकरण देताना मेघना बोर्डीकर म्हणाल्या, संबंधित गावातील ग्रामसेवकाबद्दल महिलांच्या तक्रारी होत्या, माझ्याजागी कुणीही असते तरी त्याच भावना असत्या. मी घडलेल्या प्रकाराबाबत स्वतः मुख्यमंत्र्यांना कल्पना दिली. रोहित पवारांना तो व्हिडिओ कुणी पाठवला, याचीही माहितीही त्यांनी स्पष्टपणे दिली. सर्वच ग्रामसेवक तसे नाहीत, पण गावात एखाद्या नेत्याचा किती हस्तक्षेप असावा हे लोकांनी ठरवले पाहिजे. सरकारच्या योजना लोकांसाठी असतात. मात्र, खऱ्या गरजूंना योजना मिळत नसेल तर त्रागा होणारच. रोहित पवार अर्धवट माहिती पसरवतात, रोहित पवारांना नेता बनण्याची घाई झाली आहे.

आमच्या मतदारसंघातले रोहित पवारांचे जुने मित्र अजितदादांकडे आले आहेत, त्यांनीच हा कार्यक्रम केलाय, असे म्हणत बोर्डीकर यांनी संबंधित व्हिडिओ रोहित पवारांना कुणी पाठवला हे नाव न घेता सांगितले. त्यांनीच रोहित पवारांना अर्धवट माहिती पोहोचवली. रोहित पवारांना काही काम नसल्याने अर्धवट माहितीच्या आधारे दुसऱ्यांना दोष देत आहेत, असा टोला लगावला. तसेच मेघना बोर्डीकर यांचा रोख अजित पवार गटाचे नेते विजय भांबळे यांच्याकडे असून त्यांनीच रोहित पवारांना अर्धवट व्हिडिओ पाठवल्याचे म्हटले आहे.

दरम्यान, ग्रामसेवकाला कानाखाली मारण्याची धमकी देत असल्याचा व्हिडिओ राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी ट्विट केला होता. टार्गेट पूर्ण केले नाही म्हणून भर कार्यक्रमात ग्रामसेवकाला थेट कानाखाली मारण्याची धमकी आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर कोणत्या अधिकारात देऊ शकतात असा सवाल रोहित पवार यांनी उपस्थित केला होता.

## भंडाऱ्यात नवे मीटर बसविल्यानंतर दुप्पट वीजबिल

**भंडारा :** महावितरणकडून जुन्या मीटरच्या जागी स्मार्ट मीटर बसविले जात असून यानंतर बिलांच्या रकमेत प्रचंड वाढ झाल्याने ग्राहक धास्तावले आहेत. भंडारा जिल्ह्यातील धारगाव परिसरात स्मार्ट मीटर बसविल्यापासून वीज बिलात दोन ते तीन पटीने वाढ झाली असून या अवाढव्य बीज बिलाने ग्राहक त्रस्त झाले आहेत.

धारगाव येथे दोन ते तीन महिन्याआधी अनेकांच्या घरी नवीन स्मार्ट मीटर बसविण्यात आले. नवीन मीटर लावणे बंधनकारक नसताना सुद्धा बळजबरीने स्मार्ट मीटर लावण्यात आले. याचा भुर्दंड गोर गरीब नागरिकांना सोसावा लागत आहे. महावितरणच्या या मनमानी कारभाराने नागरिकांत रोष व्यक्त केला जात आहे. दरम्यान, 'महावितरण' च्या कर्मचाऱ्यांनी जुने वीजमीटर बदलून नवीन वीजमीटर बसविलेल्या अनेक भागातील रहिवासी अशाच प्रकारे वाढीव बिले आल्याच्या तक्रारी करत आहेत. त्यामुळे नवीन वीजमीटरमुळे अचूक वीजबिल येते. या 'महावितरण'च्या दाव्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, जुने मीटर सुरू असून कोणतेही कारण नसताना खाजगी कंत्राटदार मार्फत स्मार्ट मीटर बसविण्यात आले. ज्यांनी मीटर बसवण्यास नकार दिला, त्यांना आता मोफत असून भविष्यात मीटर विकत घ्यावे लागणार अशी बतावणी करून बळजबरीने स्मार्ट मीटर लावण्यात आले. तर काही नागरिक घरी नसताना त्यांची परवानगी न घेता मीटर लावण्यात आल्याचे वीज ग्राहक सांगत आहेत. याचा भुर्दंड नागरिकांना सोसावा लागत असून मीटर बदलून देण्याची मागणी धारगाव येथील नागरिकांची आहे.

भंडारा जिल्ह्यातील पलाडी येथील विशांत शामकुंवर यांच्या घरी स्मार्ट मीटर लावण्यात आले. परंतु त्यांनी विरोध करत लगेच लावलेला मीटर काढून जुनेच मीटर लावून घेतले. त्यांना आधी ९०० रुपया पर्यंत वीज बिल येत होते. तर आता त्यांना चक्क ५० हजार बिल आल्याने त्यांच्या समोर मोठे आर्थिक संकट उभे आहे. या प्रकारावरून महावितरणचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. शामकुंवर यांनी वीज बिल कमी करून देण्याची मागणी केली आहे.

वीज वापराच्या कालावधीनुसार दर आकारणी करून, अचूक वीजबिल देण्याच्या उद्देशाने 'महावितरण'कडून राज्यभरातील वीजग्राहकांचे जुने वीजमीटर बदलून मोफत नवीन मीटर बसविण्यात येत आहेत. मात्र, मीटर कार्यान्वित झाल्यानंतर दुपटीने वीजबिले आल्याच्या तक्रारी वीजग्राहक करीत आहेत. जुने वीजमीटर बदलून नवीन वीजमीटर बसविताना पूर्वसंमती घेतली जात नाही.

नवीन 'टीओडी' मीटरच्या बिलिंग पद्धतीची माहिती दिली जात नाही. वाढीव वीजबिल आल्यानंतर तक्रारीची दखल घेतली जात नाही.

माझ्या वीज बिलामध्ये अनियमित आणि अनपेक्षित वाढ झाली आहे. नवीन मीटर बसविल्यापासून वीज बिल खूपच जास्त आले आहे. यामुळे बिल भरण्यास आर्थिक अडचणी निर्माण होत आहेत. — रविशंकर वैद्य, धारगाव.

माझ्या घरी नवीन स्मार्ट मीटर लावण्यात आले आहे. पूर्वी मला ३०० रुपये वीज बिल यायचा, आता मात्र १५०० रुपये येत आहे. हा मीटर बदलून जुना मीटर लावून देण्यात यावा. — पुरुषोत्तम ठवकर, धारगाव.

माझ्या घरी दोन महिन्या अगोदर स्मार्ट मीटर लावण्यात आला. त्याआधी मला ५०० ते ६०० पर्यंत बिल येत होते. मीटर लावल्यानंतर पहिल्या महिन्यात १३०० व मागील महिन्यात १५०० बिल आले आहे. मीटर बदलून देण्यात यावा. — विजय डोंगरवार, धारगाव.


